# महात्मा फुले कृषी विद्यापीठ

## ग्रामीण कृषि मौसम सेवा

## कृषी हवामानशास्त्र विभाग

विभाग प्रमुख : डॉ. ज. दा. जाधव | कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ | फोन : ०२०-२५५३८००९


## सोलापूर

दिनांक: ०८.०१.२०१९

### हवामान अंदाज :

| Solapur | Rain | Tmax | Tmin | CC | RH-I | RH-II | WS | WD |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **09.01.2019** | 0 | 32 | 11 | 0 | 61 | 33 | 7 | 98 |
| **10.01.2019** | 0 | 32 | 11 | 0 | 61 | 33 | 11 | 89 |
| **11.01.2019** | 0 | 30 | 11 | 0 | 63 | 33 | 11 | 117 |
| **12.01.2019** | 0 | 30 | 12 | 0 | 63 | 31 | 12 | 132 |
| **13.01.2019** | 0 | 31 | 13 | 1 | 62 | 30 | 14 | 142 |

### हवामान अंदाजावर आधारीत कृषी सल्ला

भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार जिल्हयात पुढील ५ दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. काढणी झालेल्या खरीप पिकांची उन्हात चांगले वळवून सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी. हरभरा , गहू, फळबागांना उपलब्धतेनुसार व अवशक्तेनुसार रात्रीच्या वेळेस पाणी द्यावे.

| पिक | पिक अवस्था | कृषी सल्ला |
|---|---|---|
| हरभरा | पिक वाढीची अवस्था | हरभरा पिकावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी पिकात पक्षीथांबे उभारावेत. हरभरा पिकातील फुलकळी लागण्याच्या वेळेस २५ किलो ग्रॅम निबोंळी पावडर रात्रभर ५० लिटर पाण्यात भिजवून कापडाच्या सहाय्याने अर्क काढून ४५० लिटर पाण्यात टाकून प्रति हेक्टर फवारणी करावी. |
| गहू | पिक वाढीची अवस्था | गव्हावरील मावा किडीच्या नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम२५ डब्ल्यू जी ५० ग्रॅम प्रति ५०० लिटर प्रति हेक्टरी पाण्यात मिसळून फवारावे किंवा डायमेथोएट ३० ईसी, ७५० मिली प्रति ५०० लिटर प्रति हेक्टर पाण्यात मिसळून फवारावे. |
| ऊस | | ऊस काढल्यानंतर हुमणीच्या नियंत्रणासाठी खोल नांगरट करावी. |
| भाजीपाला | पिक वाढीची अवस्था | भाजीपाला पिकावरील रस शोषक किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची किंवा इमिडाकलोप्रीड १७.८ एस एल २ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. भाजीपाला पिकावरील रोग नियंत्रणासाठी कार्बाडॅझिन १० ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| तूर | शेंगा भरण्याची अवस्था | तुरीमधील फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये घाटे अळी/ पिसारी पतंग व शेंग माशी यासाठी एकात्मिक किड व्यवस्थापन पध्दतीने नियंत्रण करावे यामध्ये तृण धान्याचे आंतरपिक असल्यास किडीचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते, एच .एन.पी.व्ही **(HNPV)** य़ा जैविक किडनियंत्रणाचा वापर करावा .फुलकळी लागताना पहिली फवारणी निबोंळी अर्क ५ **%** दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १२ ते १५ दिवसांनी हेलीओकील **(HNPV)** ५०० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टर व गरजेनुसार तिसरी फवारणी १८ .५ **%** प्रवाही क्लोरअॅट्रीनिलीप्रोल **(**कोरॅझोन**)** १५० मिली अथवा इमामेक्टीन बेझोएट २०० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| कापूस | | गुलाबी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी कापसाची वेचणी झालेल्या क्षेत्रामध्ये खोडासह समुळ झाडांची काढणी करुन खोल नांगरट करावी व काढलेल्या प-हाट्या जाळून नष्ट करावे. |

| | | |
|---|---|---|
| जनावरांचे व्यवस्थापन | | जनावराच्या गोठ्यामध्ये व कुकुटपालनात (मोठे बल्प लावावेत) उबदार वातावरण राहील अशी काळजी घ्यावी. मेंढ्यांना आंत्रविषार व घटसर्प रोगांवर प्रतिबंध उपाय म्हणून लसीकरण करुन घ्यावे. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.**